Exh.1/B

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.288 /२०२५

**मे. जिल्हा न्यायाधीशसो कोल्हापूर, यांचे कोर्टात**

1. सौ सुशीला महादेव ढोबळे
   व व 57 ,धंदा घरकाम, .......... अर्जदार
   रा.वळीवडे, ता .करवीर,
   जि. कोल्हापूर

   विरुद्ध

1. श्रीमती पार्वती अण्णा ढेरे
   व व -71 धंदा -घरकाम
   रा .हेरले ,ता हातकणंगले
   जिल्हा कोल्हापूर,
2. संतोष अण्णा ढेरे
   व. व- 34, धंदा- शिक्षक
   रा सदर ,
3. सौ सुनीता अरुण पवार
   व व 44 ,धंदा- घरकाम
   रा.तारदाळ ,ता.हातकणंगले ,
   जिल्हा कोल्हापूर,

वी.प

4. श्रीमती अनुसया अण्णा ढेरे
   व.व ७५,धंदा-घरकाम
   रा. शाहूपुरी ६ वी गल्ली,हनुमान मंदिर
   पाठीमागे,करवीर, जि.कोल्हापूर

<u>**सी पी सी कलम 24 प्रमाणे अर्ज,**</u>

<u>**यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज असा की,**</u>

KAVITA BIPIN AGRAWAL

Digitally signed by KAVITA BIPIN AGRAWAL
Date: 2025.11.10 18:04:06 +0530

order
Issue notice to Opponents

PDJ, Kolhapur
07/11/2025

Asstt.Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

1) मी व माझी आई अनुसया  दोघींनी मिळून हेरले येथील गट क्रमांक 1750, 253 ब, व घर मिळकती अनुक्रमे सी स नंबर 811,821, या मिळकतींचे वाटप होऊन मिळण्यासाठी रे क नंबर 12 /2010 चा दावा दिनांक 30/ 1 /2010 रोजी दाखल केला होता.

2) त्या दाव्याचा निकाल माननीय पिठासिन अधिकारी एस जे पेंडे यांनी दिनांक 17 /12/ 2024 रोजी दिलेला आहे तो दावा अंशतः मंजूर करण्यात आलेला आहे.

3) रे क नंबर 12/ 2010 चे निर्णयाप्रमाणे त्याची अंमलबजावणी होऊन मिळावी म्हणून मे.सिविल जज ज्युनिअर डिव्हिजन वडगाव यांचे कोर्टात रे द नंबर 4/2025 ही दरखास्त शेत मिळकतीचे वाटप होऊन मिळण्यासाठी दाखल केलेली आहे तर घर मिळकतीबाबत फायनल डिक्री होऊन त्याचा कब्जा मिळण्यासाठी फायनल डिक्रि क्रमांक 1/2025 ची दाखल केलेली आहे.

4) वर नमूद केलेल्या दोन्ही कामाच्या नोटिसा यातील प्रतिवादी ना लागू झाल्या व ते अँड.ए बी घोरपडे यांचे वकीलपत्र देऊन हजर झाले व त्यांनी प्रस्तुत दरखस्तीस म्हणणे देणार आहे म्हणून या कामी निशाणी 9,10 व 11 वरती केवळ मुदतीचे अर्ज दिनांक 25/ 2 /2025 ,15/ 4 /2025 व 8/5/2025 रोजी दिले होते पैकी फेब्रुवारी व एप्रिल चा अर्ज मे. कोर्टांनी मंजूर केला व मे मधील अर्जावर सविस्तर आदेश करून तो त्यांचा अर्ज मंजूर केला व तदनंतर दिनांक 27/ 6 /2025 रोजी निशाणी 12 वरती अर्ज देऊन निशाणी 11. वर आदेश सेट असाइड करण्याचा अर्ज दिला त्या अर्जावर कायदेशीर आदेश पारित न करता त्यावर आदर साईड टू से न करता तो रीड अँड रेकॉर्ड करून सामील केला गेला व निशाणी 13 वरती वि.प नंबर 2 चे म्हणणे दाखल करून घेतले.

Sanjeeve

**Asstt.Superintendent(Lit.)**
**District Court,Kolhapur**

5) प्रस्तुत रे द नंबर 4/2025 मध्ये निशाणी 13वरती वि.प नंबर 2 ने सविस्तरपणे म्हणणे दिलेले आहे ते रीड अँड रेकॉर्ड करण्यात आलेले आहे त्या म्हणण्यामध्ये वादी दरखास्तदार क्रमांक 1 या मयत झाल्या आहेत असे कथन केलेले नाही तथापि मी कोर्टाने निशाणी 1 वरती चुकीने जे डी ना पुढे करून वादी दरखास्तदार क्रमांक 1 या मयत असलेचे भासवून या कामी तिला निष्कारणपणे नोटीस काढणे बाबतचा आदेश दिनांक 26/8/2025 रोजी निशाणी एक वरती मे कोर्टाने पारित केलेला आहे.

6) वादी दरखास्तदार क्रमांक 1 श्रीमती अनुसया अण्णा ढेरे या हयात आहेत व तिनेच मे कोर्टात आपल्या मुलीसह रे क नंबर 12/2010 चा दावा मी कोर्टात हजर राहून दिनांक 30/1/2010 रोजी दाखल केलेला आहे व ती सध्या हयात आहे.

7) प्रस्तुत रे द नंबर 4/ 2025 मधील निशाणी एक वरती आदेश हा दिनांक 26/8/2025 रोजी केलेला दिसून येत आहे तर रोजनामेची नक्कल घेतली असता त्यामध्ये वादी दरखास्तदार यांना नोटीस दिनांक 18/7/2025 रोजी पाठवले असल्याचे कथन करून तेवढाच मजकूर शाईने लिहून नक्कल अदा केलेली आहे खरे तर आदेश दिनांक 26/8/2025 चा असताना तिला नोटीस ही त्यापूर्वी 18/7/2025 तारीख दाखवून बेकायदेशीर नोंदी रोजनाम्यात केलेल्या दिसून येत आहेत.

8) अंमलबजावणी कोर्टास डिक्रि च्या बाहेर जाऊन विचार करता येणार नाही असे वादी दरखास्त दार चे वकिलांनी वारंवार सांगू नये त्या जाणून बुजून जे डी ना मदत करत आहेत व दर खास ती अंमलबजावणीस वेळ काढू पणा करत आहेत.

9) सी पी सी कलम 54 प्रमाणे दरखास्त व सोबतचे सर्व कागदपत्रे दरखास्त दाखल तारखेसच (precept) मे कोर्टाने पाठवणे आवश्यक असताना

Sargapur

Asstt.Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

निष्कारणपणे या कामात जे डी स मदत करण्यासाठी ती दिनांक 28/1/2025 पासून रोखून ठेवलेली आहे.

10) तसेच फायनल डिक्रि क्रमांक 1/2025 चे कामीही मे कोर्टाने त्यावर जरूर तो आदेश करून मा उपाध्यक्ष भूमी अभिलेख हातकणंगले यांचे कडे न पाठवता ते कोणत्याही कारणाविना विना आदेशाचे पडून राहिलेले आहे.

11) प्रस्तुत पीठासन अधिकारी चे विरुद्ध दरखास्त दारांचे वकिलांनी आपण वडगाव ला आलेले मुदतीत केलेल्या तक्रारीची बाब पुढे करून वादी दरखास्तदारांना पिठासन अधिकारी न्याय न देता ते त्यांना जाणून बुजून त्रास देत आहेत व कर्तव्यात कसूर करत आहेत.

12) अर्जास कारण: -

प्रस्तुत कामी मी कोर्टांनी दिनांक 26/8/2025 रोजी दरखास्तदार क्रमांक एक श्रीमती अनुसया अण्णाप्पा ढेरे यांना अधिकार बाह्य जाऊन तिची मे कोर्टात उपस्थितीची गरज नसताना निशाणी एक वरती तिला नोटीस काढण्यात यावे म्हणून आदेश केला त्यावेळी प्रथम व तदनंतर वेळोवेळी आज अखेर अर्जासकारण घडत आहे.

13) सदरची रे द नंबर 4/2025 ही मा सिव्हिल जज ज्युनियर डिव्हिजन वडगाव येथे मा एस जे पेंडे यांचे कोर्टात चालू असलेले त्याबाबत सीपीसी कलम 24 प्रमाणे प्रस्तुत अर्जदाराला मे कोर्टात अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे व तो अर्ज नई कोर्टात चालण्यास पात्र आहे.

14) भारतीय पुरावा कायदा कलम 103 प्रमाणे वादी दरखास्तदार क्रमांक 1 ही मयत नसताना ती मयत आहेत असे जे डी चे म्हणणे असेल तर तिचा मृत्यूचा दाखला ते या कामी दाखल करणे तयार नाहीत मूळ दावा चालला त्यावेळीही त्यांनी मूळ दावेत निशाणी 84 वरती अर्ज

Sargjekar

Asstt.Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

देऊन तिला साक्षी समज पाठवणे बाबत अर्ज दिला होता तो अर्ज मे कोर्टानी दिनांक 31/1/2022 रोजी ना मंजूर केलेला आहे.

15) तसेच एस जे पेंडी यांनी आपले दिले न्यायनिर्णयातील (रे क नंबर 12/2010) चे कलम 37 मध्ये वादी क्रमांक एक ही हयात असल्याचे अवलोकन केलेले आहे.व मी सदरचा अर्ज दाखल करताना हजर नसलेने तिला वि.प करून सामील (Formal) केलेले आहे.

16) अर्जदार यांचा मे.कोर्टावरती विश्वास राहिलेला नाही . त्यांना ने कोर्ट पासून न्याय मिळेल असे वाटत नाही.

17) सबब अर्जदारांची मे कोर्टास नम्र विनंती अशी की,

अ) रे द नंबर 4/2025 व फायनल डिक्री 1/2025 ही दोन्ही कामे मा. एस जे पेंडे यांचे कोर्टातून वर्ग करून तो वडगाव येथील अन्य कोर्टात वर्ग करण्यात यावे ही नम्र विनंती.

ब). जरूर तर अर्ज दुरुस्ती परवानगी असावी .

येणेप्रमाणे असे

कोल्हापूर

ता.31/7. 2025.

सु. म. ढोबळे.

**ॲफिडेव्हीट**

मी यातील अर्जदार माझे नाव सुशीला, पतीचे नाव महादेव ,आडनाव ढोबळे ,व व 57 ,धंदा- घरकाम ,रा. वळीवडे , ता .करवीर, जिल्हा कोल्हापूर, देवाची शपथ घेऊन खरे सांगते की वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे

कोल्हापूर

ता. 31/10/ 2024

सु. म. ढोबळे.

(Adv. S. S Chavan)

Sanjeevani

Asstt.Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार सौ. सुशिला महादेव ढोबळे, व.व. ५७, धंदा – घरकाम, रा. वळीवडे ता. करवीर जि. कोल्हापूर आज मुा कोल्हापूर आज मुा कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझ्या सांगणेप्रमाणे टंकलिखीत आला असून तो मी वाचला पाहिला आहे तो खरा व बरोबर आहे.

कोल्हापूर

दि. ३१/१०/२०२५

सु. म. ढोबळे.

Solemnly affirmed before me by
Shri./Smt. Sushila Mahadeo Dhobale.
Age 57 Occp. Household, R/o. Valiwade.
who is identified by Shri S. S. Chavan.
..............Adv. whom I Know Personally
Dt. 31/10/2025.

Sanjeevani

Asstt.Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur